# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/02/2023 (गुरूवार) दुपार

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०५ किमी अंतरावर दहेगाव रंगारी येथे दिनांक ३१/०१/२०२३ चे १४.३० वा. ते २.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— अनिस अहमद सिद्धकी, वय ४७ वर्ष, राहणार वलनी कॉलनी याचे दहेगाव रंगारी न्यू लाईफ हॉस्पिटलच्या समोर अहमद ट्रान्सपोर्ट नावाच्या ऑफिस समोर फिर्यादीचे घराचे काम सुरू आहे. फिर्यादी हे आपल्या मकानाचे इलेक्ट्रीक फिटिंगचे काम पाहण्याकरिता गेले असता, फिर्यादीला काही इलेक्ट्रिक वायर तुटलेले दिसले. आरोपी नामे— १) किशोर चव्हाण राहणार, रा. गीता नगर झिंगाबाई टाकळी नागपूर (२) नितेश रामटेके रा. इंदिरा माता नगर झिंगाबाई टाकळी नागपूर यांनी नमुद घटनास्थळी येथील ६ एम एम, १५० फुट, ४ एम एम चा १५० फूट, २.५ एम एम चा १५० फूट, २ एम एम चा १५० फूट, १ एम एम चा १५० फूट असा एकूण ९०० फूट इलेक्ट्रिक वायर असा एकुण किंमती अंदाजे ११,०००/— रुपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राउत मो. नं ४७८ मो. नं ८५५४९६७९४० हे करीत आहे.

## जबर दुखापत

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत ०१ कि मी अंतरावरील मानकर यांच्या किराणा दुकाना समोर सावनेर येथे दिनांक ०१/०२/२०२३ चे १९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रदीप श्रावणजी बाळबुधे, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. ७ सूभाष शाळेमागे मागे सावनेर व आरोपी नामे— सुरेश चरपे, रा. सावनेर हे एकमेकांचे शेजारी राहत असुन घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे काम करून घरी परत आल्यावर फिर्यादीच्या पत्नीने फिर्यादीला सांगितले की दोन दिवसा पुर्वी यातील आरोपी याने रात्री घराचे दार ठोकले तेव्हा दार उघडले असता आरोपीने शिव्या दिल्या असे सांगितल्या वरून फिर्यादी यांनी आरोपीस विचारले की तुम्ही माझे घराचे दार का ठोकले आणि माझी पत्नी सुहानी हिला का शिवीगाळ केली असे विचारल्या वरून आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून डावे हातावर काडीने मारून गंभीर जखमी करून हात फॅक्चर केले व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४, ५०६ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मुळे पोस्टे सावनेर मो. क्र. ८८३०७६९९०५ हे करीत आहे.

# फसवणुक

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर क्रिडा स्कुल मौदा येथे दिनांक ०४/०१/२०२३ चे १२.०० वा. ते ०६/०१/२०२३ चे ०४.३६ वा. दरम्यान फिर्यादी नामे– मिताली मंगेश येळने हिने इन्स्टाग्राम येथे हिंदुस्थान पेन्सील पॅकेजींग जॉब बाबत जाहीरात पाहीली असता त्यासाठी अप्लाय केला फिर्यादीने दिलेल्या मोबाईल व्हॉटसअप क्रमांकावर संपर्क साधला असता त्यांनी तिला इन्स्टाग्राम ॲप वर लींक पाठविली व रजिस्ट्रेशन करायला सांगीतले नंतर व्हॉटसॲप वर संपर्क साधायला लावला त्यांनी हिंदुस्थान पेन्सील प्रा.ली. यांचा कार्ट ॲक्टीवेशन साठी फिर्यादीला ६२०/–रू. भारत पे या ऑनलाइन आयडी स्कॅनरवर पाठवायला लावले व ते तिने पाठविले त्यांनी तिला पाठविलेल्या पेमेंट मधील ६००/– रू ७०००/– रू. या रकमेचा पेन्सील पॅकेजींग परत तुमच्या पत्त्यावर येईल असे सांगीतले. दिनांक ०६.०१.२०२३ रोजी डिलीवरी बॉय याने त्याचे मोबाइल वरून कॉल आला असता त्याने सांगीतले की तुमचा कार्ड डीएक्टीव्ह झाला आहे त्यासाठी ३२१०/–रू रकमेचा पेमेंट करा असे सांगीतले असता अगोदरच्या स्कॅनर वर ३०००/–रू पाठविले व लगेच पुन्हा १२०/–रू पाठविले त्यावेळी डीलेव्हरी बॉयला कॉल केला असता त्यांनी सांगीतले की तुम्ही उशिरा पेमेंट केल्याने युपीआय आयडी बंद पडली आहे त्यानंतर काही वेळाने कॉल केला सांगीतले की राजीव सींग या एम्प्लॉयला कॉल करा व युपीआय आयडी पुन्हा सुरू झाल्याने ५५००/– रू पेमेंट करायला सांगीतले त्यानंतर त्यांनी सांगीतले की हा सर्व पेमेंट रीटर्न करण्यासाठी फिर्यादी हिला जीएसटी च्या नावाखाली १८०००/–रू पेमेंट करायला लावला तिच्या कडे तितके पैसे नसल्याने १२०००/– रू पाठविले त्यांनी सांगीतले की जीएसटी ॲक्टीव्ह झाली त्यानंतर पेमेंट रीटर्न साठी १७९९९/– रू पेमेंट करायला लावल्याने फिर्यादी हिने पेमेंट केला त्यानंतर सांगीतले की जास्त वेळ झाल्याने पुन्हा पेमेंट करायला लागेल पुन्हा १२०००/– रू पाठविले त्यांनी सांगीतले की १२०००/– रू मध्ये १२०००/– रीटर्न होत नाही १८०००/– रू पाठवले त्यानंतर पुन्हा सांगीतले की ३० मिनीटे उशिर झाल्याने १९०००/–रू पाठवावे लागेल फिर्यादीने पेमेंट केले नाही पेमेंट रीटर्न ३० मिनीटांनी होईल असे सांगीतले पण पेमेंट रीटर्न झाला नाही आरोपीने आपला फोन स्विच ऑफ करून ठेवला त्यांनतर फिर्यादीचा कुठलाही संपर्क झाला नाही त्यानंतर फिर्यादीला कळले की आपल्या सोबत ऑनलाइन फ्रॉड झाला आहे फिर्यादी यांनी मोबाइल धारक याने पाठविलेल्या युपीआय आयडी एकुण ९०७००/– रूपयाचे ऑनलाइन पेमेंट केले फिर्यादीचे सदर आरोपी मोबाईल धारकाने फिर्यादीस हिंदुस्थान पेन्सील पॅकजीन जॉब लावुन देतो म्हणुन फिर्यादी कडुन ९०७००/– रू ऑनलाइनच्या माध्यमातुन काढुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक खराबे पो.स्टे. मौदा ९९२३४३८३५५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**